॥ तुझ्या ऊसाला लागल कोल्हा ॥

गायिकाः सुलोचना चव्हाण
गीतः ग. दि. माडगूळकर
संगीतः राम कदम

फड साम्भाळ तुऱ्याला ग आला
तुझ्या ऊसाला लागल कोल्हा ॥ धृ. ॥

मूळ जमीन काळ सोनं
त्यात नामांकित रुजलं बियाणं
तुझा ऊस वाढला जोमानं
घाटा-घाटान उभारी धरली
पेरा-पेरात साखर भरली
आता वाढीला जागा नाही उरली
रंग पानांचा हिरवा ओला ॥ १ ॥

लांब रुंद पिकला बिघा
याची कुठवर ठेवशील निगा?
(गद्यातः सुरेख वस्तु म्हणजे आवतान जग)
याला कुंपण घालशील किती?
जात चोरांची लई हिकमती
आपली आपणच धरावी भिती
अर्ध्या रात्रीत घालतील घाला ॥ २ ॥
तुला पदरच सांगत न्हाई
काल ऐकू आली कोल्हेकुई
(गद्यातः पोट भरल्याबिना काही ढेकर येत नाही)
माझ्या बोलण्याचा धरू नको राग
अर्ध्या रात्रीला कोण राहील जागं?
बघ चिखलात दिसतयात मागं
कुणितरी आला अन् गेला ॥ ३ ॥